प्रेसनोट

दिनांक ०१/१२/२०१८

**ग्राम पंचायत बेंबरा, माणुर, गोगोतांडा ता.देगलूर येथील ग्रामसेवक अशोक विठ्ठलराव धमने यांनी १४,०००/–रु. लाच स्विकारल्यानंतर नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.**

यातील तक्रारदार यांनी दिनांक ०१/१२/२०१८ रोजी तक्रार दिली की, " **त्यांचे वडीलोपार्जीत प्लॉटचे ग्राम पंचायत कार्यालय नमुना नंबर ८ रजिस्टरला नोंद घेऊन उतारा देण्यासाठी ग्रामसेवक धमने १५,०००/–रू. ची लाच मागणी करीत असल्याची तक्रार दिली".**

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०१/१२/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन गोगो तांडा ता.देगलूर तक्रारदार यांचे घराचे परिसरात पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये ग्रामसेवक धमने यांनी तक्रारदाराचे यांचे वडीलोपार्जीत प्लॉटचे ग्राम पंचायत कार्यालय नमुना नंबर ८ रजिस्टरला नोंद घेऊन उतारा देण्यासाठी त्यांच्या पदाचा दुरूपयोग करून स्वत:चा आर्थिक फायदा करून घेण्याचा उदेशाने तक्रारदार यांचेकडे १५,०००/– रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १४,०००/–रू.ची लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

तसेच आज दिनांक ०१/१२/२०१८ रोजी गोगो तांडा ता.देगलूर तक्रारदार यांचे घराचे परिसरात लावण्यात आलेल्या सापळयामध्ये आरोपी लोकसवक अशोक विठ्ठलराव धमने, वय ४८ वर्ष, पद ग्रामसेवक यांनी तक्रारदार यांचे नमुद कामासाठी पंचा समक्ष १४,०००/–रू. लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी पोलीस स्टेशन मरखेल जि.नांदेड येथे आरोपी लोकसवक अशोक विठ्ठलराव धमने, वय ४८ वर्ष, पद ग्रामसेवक नेमणुक ग्राम पंचायत बेंबरा, माणुर व गोगो तांडा ता.देगलूर राहणार शारदानगर, बाबु बिरादार यांचे घरा शेजारी देगलूर ता.देगलूर यांचे विरुध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक (संशोधन)अधिनियम २०१८ नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रमांक :– १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रमांक ०२४६२–२५३५१२

३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रमांक ८९७५७६९९१८

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net

Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

( विजय डोंगरे )

पोलीस उप अधिक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.